# युरोप (२०१९)

## इटली (रोम)

व्हेनिसहून सकाळी ६ ची वॉटरबस पकडून रेल्वेस्टेशनवर आलो. व्हेनिस ते रोम जलद गाडी पकडून जायचं ठरवलं होत. ट्रेन आली आणि तिला पाहून लहान मुलांसारखे हरखूनच गेलो. जागेवर बसलो आणि अद्ययावत गाडीची वैशिष्ट्ये दिसू लागली. प्रशस्त पॅसेज, आपोआप उघडणारे स्वच्छ काचेचे दरवाजे, डोळ्यात पूर्ण मावणार नाही अशी खिडकी, बाजूला उघडणारी मोठी टेबले, सामान ठेवायला मोकळी जागाही.! समोर वरती त्या ट्रेन बद्दलची माहिती दिसत होती. किती वेगाने गाडी जाणार, कुठे थांबणार, आतले तापमान, बाहेरचे तापमान, गाडीचा सध्याचा वेग, याव्यतिरिक्त मला आवडलेली गोष्ट म्हणजे मोटरमनच्या पुढल्या कॅमेरातून दिसणारे धावत निघालेले रूळ! जाताना एवढे बोगदे लागत होते आणि ते पण एवढ्या वेगाने की कानात दडे बसायचे, एक जाईपर्यंत दुसरा यायचा, नंतर नंतर आता नको ते बोगदे वाटू लागलं. पण एकूण प्रवास खूप मजेशीर होता. रोमला पोचलो ११.३० वाजता आणि सगळ्यात पहिल्यांदा तिथेच रोमा पास खरेदी केला. तिथून बाहेर आलो आणि एका मोठ्या बस स्टॉपपाशी आमच्या रोमच्या घराकडे जाणारी बस शोधली. तिथे आल्यावर मुंबईची गर्दी, गजबजाट आठवू लागला. एक दोघांना विचारल्यावर माहिती मिळाली आणि आम्ही निघालो घराकडे. हे आमचं घर 'कॉलेझियम' या जगप्रसिद्ध पर्यटनस्थळाजवळ असल्याने शोधायला फारसा त्रास नव्हताच. आम्ही बस स्टॉप वर उतरून चालतच निघालो. घरापाशी हुसेन आमच्यासाठी थांबला होता. त्याने चांगल्या प्रकारे

मार्गदर्शन केले, आम्ही अतिमागास देशातून आल्यासारखं त्याला वाटत असावं, लिफ्ट कशी वापरावी यावर त्याने आमचे बौद्धिक घेतले, आम्ही राग न मानता ते त्याचं आमच्या सुरक्षिततेसाठी सांगणं मजेत ऐकले. हे आमचं घर एका मोठ्या इमारतीत असल्याने इथे लिफ्टची सोय होती. इथली आमची मालकीण बाई 'अंतोनिता' फारशी इकडे फिरकत नसल्याचे हुसेनने सांगितले. त्याने सगळ्या सोयी, सुविधांची माहिती करून, घर दाखवून तो निघाला पण !. आम्ही इथेहि नशीबवान होतो. हे घर आत्तापर्यंत राहिलेल्या सगळ्या घरांमध्ये अतिप्रशस्त होते. बाथरूमच्या बाजूला एक छोटीशी स्टोअर रूम पण होती. त्यात छोट्या छत्र्या, चहाचे विविध प्रकार, कॉफीची पाकीटं, साखरेचा छोटा डबा असे सारे छान मांडून ठेवले होते. पाहुण्यांच्या सोयीची चांगली देखभाल केली होती. बाहेर छोटीशी बाल्कनी त्या घराला शोभा आणत होती. जेमतेम २ माणसं मावतील एवढीच जागा, खरंच मोकळा श्वास घेत ती बाल्कनी घराला घरपण देत होती.

जेवण उरकून बाहेरचे बस स्टॉप शोधून आम्ही ८७ नंबरच्या बसने सर्वात लांबच्या ठिकाणाकडे निघालो. बस मधून दिसणारे रोमचे दर्शन आवडू लागले. पर्यटकांची गर्दी असली तरीही शहराचा नूर भव्यदिव्य वास्तू, दिमाखदार पुतळे यातून काही और आहे ह्याचा प्रत्यय येऊ लागला. बस ड्राइवरने आमचा स्टॉप आल्याचे सांगितले आणि आम्ही घाईने उतरलो. ‘विला बोर्गीसा’च्या बागेत शिरलो, जवळच माहितीचा फलक लावला असल्याने तो वाचून तिकिटासाठी उभे राहिलो. परंतु इथे मात्र निराशा झाली, आमच्यासारखे बरेच जण बाहेरून इमारतीचे फोटो काढून

परतले. बागेत हिंडलो आणि तिथूनच चालत 'पियाझ्झा दे पोपोलो'ला निघालो.




शहराच्या उत्तेरला असलेला हा भव्य चौक आणि त्याच्या मधोमध असलेला भव्य मनोरा चांगलाच लक्ष वेधून घेत होता. हा खऱ्या अर्थी लोकांचा लोकांसाठी असलेला चौक होता. त्याच्या नावातले 'पोपोलो'ही तेच सांगत असावे. अठराव्या शतकातला हा चौक मृत्यूदंडासाठीही प्रसिद्ध होता. उत्तरेकडून रोममध्ये येण्याचा हा मार्ग होता. तिथून पुन्हा आम्ही चालत निघालो ते स्पॅनिश स्टेप्सकडे. इथल्या गल्ल्या बघून मजा वाटत होती. सगळ्या सारख्याच वाटू लागल्या शिवाय गर्दी ही इतकी होती कि वाटले हरवून जाऊ. १००-१३० स्पॅनिश स्टेप्स चढून गेल्यावर वरती सुरेख चर्च आहे. वरून खाली बघितले आणि एक क्षण मुंबईतल्या गोपाळकाल्याच्या वेळी दिसणाऱ्या गल्ल्यांचे दृश्य आठवले. खाली समोरची गल्ली अशीच रंगबिरंगी दिसत होती.



तिथून जगप्रसिद्ध ट्रेव्ही फौंटनकडे निघालो. तिथे पोचलो तर जत्राच भरल्यासारखे वाटले. खूप गर्दी होती. तरी थोडा वेळ थांबून मनभरून ट्रेव्ही कारंजाचे विविध कोनातून फोटो काढले, चालून चालून दमलोही होतो, त्यामुळे तिथे थोडा वेळ विश्रांती घेऊन पियाझ्झा डी नोव्होनोला निघालो, या चौकात पर्यटक खाणेपिणे, निवांत बसून बाजूला वाजणाऱ्या वाद्यांचा आनंद घेत होते. रोमच्या प्रकृतीचे ते एकूणच मूर्त रूप होते असे मला वाटले. रोम हे खऱ्या अर्थाने मनसोक्त फिरण्याचे , मनमुराद आनंद लुटण्याचे एक उत्साही शहर आहे. तिथल्या उन्हात फिरल्यावर भारताची आठवण जास्तच येऊ लागली. एकूण वातावरणातला हा बदल आम्हाला अगोदरच भारतात घेऊन आला. बरेच चालत फिरत आल्याने आता आम्हाला बस शोधणं गरजेचं वाटू लागलं. एका बस स्टॉप वर उभे राहिलो. बसमध्ये बरीच गर्दी असल्याने एक बस सोडून दिली. पर्यटक आणि रोजचे प्रवासी सगळ्यांचीच गर्दी होती. आम्ही ऐकले होते

की इटलीमध्ये फिरताना सामान आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने जरा सावध राहावे लागते. पण पुढल्या बस मध्ये मात्र कमी गर्दी बघून चढलो. बसायला जागा नव्हतीच, शिवाय स्टॉप ही माहिती नव्हता त्यामुळे आम्ही सगळे जरा जास्तच सावध होतो. येणारी झोप आवरत, सावरत एकदाचे उतरलो, तिथून घर शोधत एकदाचे पोचलो आणि सकाळपासूनची आम्ही भटकंती थांबली. रात्री ८ ला आमचा दिवस संपला पण बाहेर अजून प्रकाश होता. जेवून दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम आखत आम्ही गप्पा मारत राहिलो. रोममध्ये असण्याचा नुसता अनुभव घेत राहिलो. खूप चालणं झाल्याने झोपेला बोलवावं लागलं नाहीच. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून समोरच 'कोलोसियम'ला जायचं असल्याने जरा आरामातच आवरलं.



एव्हाना ऊन डोक्यावर आलं आणि आम्ही कोलोसियमच्या रांगेत उभे राहिलो. आम्हाला दुपारी २.३० ची वेळ मिळाल्याने आम्ही जवळच्या पॅलेण्टाईन टेकडी आणि रोमन फोरम बघायला निघालो. इतिहासाचे

विखुरलेले अवशेष, त्यातले तुकडे तुकडेच आम्हाला माहित त्यामुळे त्याची जुळवाजुळव करत आम्ही हिंडत राहिलो आणि ठरलेल्या वेळी कोलोसियम बघायला पोचलो. इथे मात्र बऱ्यापैकी ढिसाळ कारभार होता. त्याच एक कारण म्हणजे अति-गर्दी परंतु नजरेत भरतील असे माहितीफलक योग्य जागी नसल्याने पण शोधाशोध करावी लागत होती. 'कोलोसियम' हे जगतविख्यात अँफिथिएटर. त्याचे ऑडिओ गाईड ऐकत आम्ही माहिती घेत पूर्ण २ तास फिरलो. थोडेसे कंटाळूनच बाहेर पडलो आणि आमच्या घराजवळच्या हॉटेलमध्ये जेवून घरी येऊन सराईतपणे चक्क बस पकडून 'संत अँग्नेलो कॅसल' बघायला गेलो.



कॅसल आणि कॅसलच्या आजूबाजूचा परिसर अतिशय रमणीय होता. बाजूची तिबर नदी आणि त्यावरचा ब्रिज यांचे दृश्य फारच सुरेख दिसत होते. तिथे भटकलो आणि जास्त वेळ न घालवता घरी येऊन आराम करायचा ठरवला, वाटेत खरेदीसाठी आकर्षक दुकान टाळणं तसं कठीणच

होतं. तिथून दुसऱ्या बाजूला व्हॅटिकन सिटीची भव्यता नजरेत भरत होती. तिथून दुसऱ्या दिवशी रात्रीच रोमहून परतीच्या प्रवासाला निघायचं होतं. सकाळी १० वाजता हे घरही सोडायचं असल्याने सामानाची तात्पुरती सोय करणंही भाग होतं. आमच्या बिल्डिंगच्या खाली एका दुकानात असे सामान ठेवायची सोय आहे असे कळल्याने तिथे विचारणा केली. तसा दुसरा काही पर्याय पण नव्हता. रोममध्ये भटकंती खूप झाली, शहरातल्या गल्ल्यातून फिरण्याची एक वेगळीच मजा आहे.

दुसऱ्या दिवशी लवकर आवरून सारे सामान खाली दुकानात ठेवले. त्यांना ५ पर्यंत येतो सांगितले आणि लगेच व्हॅटिकन सिटीला निघालो. बसने जिथे उतरलो तिथेच बाजूला आत कसं फिरता येईल, किती वेळ आहे अशी चर्चा करत असतानाच समोरच्या एका फेरीवाल्याने आम्ही भारतातून आलो का असे विचारले. आम्ही हो सांगताच तो म्हणाला मी आसाम मधून इथे पोटापाण्यासाठी आलोय असे सांगताच आम्हाला फारच आश्चर्य वाटले. त्याच्याशी बोलताना आम्ही त्याला सांगितले की आम्ही तिकीट काढले नाहीये आणि आमच्याकडे वेळ पण थोडा आहे तर आम्हाला एखादा गाईड मिळेल का इथे एखादा. त्याने लगेच त्याच्या ओळखीच्या गाईडला बोलावून आम्हाला त्याच्या टूरमध्ये सामावून घेण्यासाठी विनंती केली. त्यानेही तत्परतेने त्याच्या एका इंग्लिश गाईड बरोबर आमची सोय केली. नेमकी त्याच दिवशी मारिया या आमच्या इंग्लिश गाईडला काही वैयक्तिक अडचणीमुळे यायला उशीर झाला. वय वर्ष ५०च्या आसपास असलेल्या मारियाच बोलणं अतिशय आकर्षक होत. तिने ओघवत्या आणि थोड्या मिश्किल भाषेत व्हॅटिकन सिटीचा परिचय

करून दिला. तिथल्या नियमाची माहिती करून दिली. आणि ती अतिभव्य इमारत, त्याचा इतिहास, त्याची वैशिष्ट्ये,त्याचे इटलीतच नव्हे तर जगातील अध्यात्मिक महत्व या सगळ्याची फार छान माहिती दिली. २ तासानंतर तिथून बाहेर पडलो तेव्हा खरेच वाटले नाही की आपण व्हॅटिकन सिटी पाहून आलोय कारण एकतर आमच्याकडे तिकीट नसल्याने आम्हाला खात्री वाटत नव्हती कि आम्ही हे नावाजलेले स्थळ पाहू शकू.



तिकडून निघून परत एका हॉटेल मध्ये पिझ्झा खाऊन दुकानात सामान घ्यायला गेलो. जवळच एक टॅक्सी स्टॅन्ड असल्याने आमची फार मोठी सोय झाली. उंच धिप्पाड, गोरापान असा टॅक्सीवाला आम्हाला रोम विमानतळावर सोडायला आला. तिथून विमानतळावर जाईपर्यंत त्या बोलक्या टॅक्सीवाल्याने आम्हाला रोम, इटलीबद्दल बऱ्याच राजकीय आणि सामाजिक घडामोडींचीही माहिती दिली.

रोम विमानतळावर बराच वेळ घालवता आला. एका मोठ्या खिडकीतून पश्चिमेला खाली सरकणारा सूर्य आणि त्याच वेळी वेगाने धावणारी आकाशात झेप घेणारी विमाने पाहताना गेल्या १३/१४ दिवसातले खूप सारे क्षण डोळ्यापुढून जात होते. खूप काही बघायचे राहिलेले आठवत होतो पण त्या ऐतिहासिक,राजकीय, भौगोलिक, नैसर्गिक गोष्टींपेक्षा खूप सारी माणसं जवळून बघता आली ह्याच समाधान या सहलीने जरूर मिळवून दिलं. जिथे पाहिजे तिथे रेंगाळलो, कंटाळलो तिथून लगेच काढता पाय घेतला. सगळे कळायलाच पाहिजे असा अट्टाहास न धरता पण खूप काही गोष्टी शिकता आल्या.

सहल सफल सुफळ झाली ह्या समाधानात विमानात झोपी गेलो ते आता नंतर कुठे जायचे ह्या विचारातच !!

**--संध्या रानडे.**

(समाप्त)

